


**About Us:** http://www.galaxyimrj.com/about-us/
**Archive:** http://www.galaxyimrj.com/archive/
**Contact Us:** http://www.galaxyimrj.com/contact-us/
**Editorial Board:** http://www.galaxyimrj.com/editorial-board/
**Submission:** http://www.galaxyimrj.com/submission/
**FAQ:** http://www.galaxyimrj.com/faq/

# मेळघाटातील आदिवासी लोकजीवन

**तृप्ती बेलसरे**

**प्रास्ताविक:**

भारतात ७०५ आदिवासी जनसमुदाय राहत असून त्यांची लोकसंख्या सव्वा बारा कोटीच्या जवळ पास आहे .महाराष्ट्रात आदिवासीच्या एकून सत्तेचाळीस जमाती आहे .महारष्ट्रात सह्याद्री ,सातपुडा ,कोकण व गोंडवाना या भागामध्ये आदिवासी जमातीचे वास्तव्य आढळून येईल . भोगोलिक वेगळेपणामुळे आदिवासी जमातीत आचार विचार आणि सांस्कृतिक कल्पना वेगळया आढळून येतात . याच वेगळया संस्कृती लोकजीवनामध्ये महाराष्ट्रात अमरावती जिल्ह्यात राहणाऱ्या मेळघाटात कोरकू ही जमात आढळते . आदिवासी जमातीमध्ये कोरकू जमातीचे विशेष स्थान आहे . आदिवासी कोरकू जमातीचे ओळख त्यांच्या संस्कृती मध्ये आहे .कोरकू जमात महाराष्ट्रात अमरावती [मेळघाट ,मोर्शी ]बुलढाणा ,अकोला [आकोट ,तेल्हारा ]मध्यप्रदेशात बुऱ्हानपूर [काख्णार. नेपानगर ] खंडवा [खालाव ,हरसूद ] छीनादावडा ,[जुन्नार्देव ,बिछुवा तथा अन्य भागात राहतात .कोरकू या शब्दाचा अर्थ कोरो म्हणजे मनुष्य जमात असा आहे .कोरकू जमात हा निसर्ग पूजक असून मातृसत्ताक पद्धतीत मानणारा आहे.आदिवासी कोरकू जमातीने आपली संकृती मौखिक पद्धतीने टिकून ठेवली आहे.त्यांची भाषा किवा संस्कृती कोठेही लिखित रुपात नाही.गेल्या हजारो वर्षापासून एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे तिचे हस्तांतर मौखिक रूपाने होत आहे.कोरकू जमातीत ढोल आणि पावी [बासुरी ] या वाद्याला खूप महत्व आहे .या वाद्याच्या तालावर हजारो वर्षांपासून त्यांचे जीवन जगत आहेत.आदिवासी च्या जीवनातील प्रत्येक हालचाल जीवनव्यवहार , सन उत्सव ,विधी परंपरा लोकगीत निसर्गाशी नाते या सगळयांचा शोध मेळघाटातील आदिवासी लोकजीवन यात शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**मेळघाटातील लोकजीवन व भौगोलिक परिस्थिती**

महाराष्ट्रात अमरावती जिल्ह्याच्या मेळघाटात आदिवासी कोरकू जमात घनदाट जंगलात वंशपरंपरागत वास्तव्यास आहे जंगलाशी त्यांचे अतूट नाते आहे. नैसर्गिक संकटांना तोंड देत खंबीरपणे जीवन फुलवीत आहे. जंगल हाच त्याचा प्राकृतिक निवास .अन्न ,वस्त्र, निवारा या मुख्य गरजा निसर्ग भागवते . त्यांच्या मुख्य व्यवसाय शेती ,मासेमारी ,पशुपालन करणे, मध, डिंक ,मोहाची फुले , तेंदूची पाने ,कंदमुळे गोळा करून उपजीविका

चालवतात .अनेक वनौषधींची माहिती या जमातीला आहे. नदीच्या काठी जंगलात ऊन वारा पाऊस झेलत नैसर्गिक आपत्तींना तोंड देत ही जमात त्या प्रदेशाच्या वातावरणात टिकून आहे.

**कोरकू समाजाची परंपरा व इतिहास**

हजारो वर्षापासून जंगल व संपत्तीचे जतन व संवर्धक कोरकू जमात करत आहे. कोरकू जमातीचे परंपरा हे वंशपरंपरेने मौखिक रूपाने रूढी चालीरीतीने चालत आलेली आहे, त्यांची बोली, परंपरा कुठेही लिखित नाही. या जमातीने आपल्या अनुभवातून व पूर्वजांपासून मिळालेल्या मौखिक साधनातून आपल्या जमातीसाठी काही नीती, नियम निर्माण केले व प्रत्यक्षतेने पालन करत आहे. सातपुडा पर्वतरांगेत अनेक नद्यांच्या ठिकाणी त्यांचे दैवत बघायला मिळतात .नदीच्या काठावर पूर्वजांचे नृत्य करण्याचे, पूजा करण्याचे, दगडावर उमटलेले ठसे ,आपल्याला पाहायला मिळतात. मध्यप्रदेश व महाराष्ट्र या दोन राज्याच्या सिमेमुळे सीमेपलीकडील व सिमेअलीकडील जमात वेगळी दर्शवली जाते . दाट जंगलाच्या ठिकाणी शिकार करणे, कंदमुळे शोधून भटकंती करण्यामुळे ते वेगवेगळ्या ठिकाणी टोळी करून राहू लागले सध्याच्या परिस्थितीत पुनर्वसन अधिनियमामुळे त्यांना पुनर्वसन करावे लागत आहे.

**राहणीमान व वेशभूषा:**

आदिवासी कोरकू जमातीची राहणीमान साध्या स्वरूपाचे आहे रोजच्या व्यवहारात साधे वेशभूषा मुख्य अन्न व प्रमुख व्यवसाय करतात.

**वेशभूषा :** आदिवासी कोरकू जमातीत स्त्रियांचे रोजचे वेशभूषा उलट्या पदराची साडी बांगड्या कुंकू पायात तोरडे गळयात मंगळसूत्र हेच दैनंदिन व्यवहारात वापरतात. वृद्ध स्त्रिया यांचे साडी घालण्याची पद्धत लुगडं घातल्याप्रमाणे आहे. तरुण पुरुष शर्ट पॅन्ट घालतात. वृद्ध पुरुष मात्र धोती कुर्ता व डोक्यात टोपी घालून असतात.

**दागिने** : कोरकू जमातीत जास्तीत जास्त सोनेपेक्षा चांदीचे दागिने वापरतात. **गळ्यातील दागिने**: असली, मंगळसूत्र **हातातील दागिने:** छन्नी , बाकड्या, बांगड्या इत्यादी **पायातील दागिने:** चेनपट्टी ,काळा ,जोडवा. **कमरातील दागिने:** कमरपट्टा. **नाकात:** नेठौ .कानात सोन्याचे किंवा चांदीचे दागिने घालतात. हे सगळे दागिने स्त्रिया घालतात. लग्नप्रसंगी पुरुष नवऱ्याला असली हे दागिने घालतात.

**आहार:-**

कोरकू जमातीचे मुख्य अन्न कुटकी (भाताचा प्रकार ) बाबा चौली (लाल भात) व बाजरीची भाकरी, मक्याची भाकरी, ज्वारीची भाकरी, इत्यादी.जगनी, सोयाबीन , तुडी तेल काढण्यासाठी वापर करतात. भाजीसाठी जंगलावर व नद्यांवर अवलंबून असतात.

**पावसाळ्यातील भाजी :-** कटलुज, बाणा आरा, डोडा आरा ,केलता [बांबूचे कोवळे कोंब], मशरूम, सुई आरा, राजाराणी आरा, कोलजारी आरा इत्यादी यांच्यासोबत खेकडे, मासोळी, झिंगे इत्यादी. कंदमुळे- बाबरा ,टोरा, इत्यादी. फळे- टेमरु ,लावा, आवळा ,तारोप[ चारोळी] बारू ,जंगलातील विविध फळे.

**शेतातून घेतलेले पीक** :- ज्वारी ,बाजरी, गहू, कोडा ,धान [तांदूळ] कुटकी, जगनी ,सूर्यफूल, मिरची इत्यादी . फळे काकडी, डांगरा, टरबूज, खरबूज इत्यादी मुख्य पिके घेतली जातात . सध्याच्या काळात शहराशी संपर्क वाढल्यामुळे व थोडी प्रगती झाल्यामुळे त्यांचे आहारात बदल झालेले दिसून येते.

**घराची रचना**:- आदिवासी कोरकू जमातीचे घरे शहरी भागापेक्षा वेगळ्या प्रकारची आहे. **भिंती**- या जमातीचे घराचे भिंती बांबूच्या पासून बनवलेल्या ताटीची किंवा राख, मातीची असते .भिंतीला शेणाने किंवा पांढऱ्या मातीने सारवतात. **छप्पर-** छपरासाठी सागवानाची पाने, वासे, गवताची पेंडी, बांबूची ताटी किंवा सागवणाचे लाकूड असते.

छपरे त उतरत्या आकाराची असते. त्यामुळे घराचे दरवाजे लहान असतात. घराची छप्पर कौलाची सुद्धा असते. घराच्या आत मध्ये धान्य ठेवण्यासाठी कुठी मातीचे बनवली असते .दळण्यासाठी जाटी , पाठा, धान कुटण्यासाठी टूखू व सेल असते. किसिंज [सुपडा] इत्यादी स्वयंपाक चुलीवर करतात चुलीला एफ्तिंज म्हणतात.

**पोट जमात:-** विविध जाती जमाती सारख्या मेळघाटात कोरकू जमातीत सुद्धा पोट जमात आहे त्यांना गोयरा नेवल असे म्हणतात आधीच्या काळामध्ये शिकार करून जगावे लागत असल्यामुळे अन्नासाठी भटकंती करावी लागत होती गोऱ्या या जमाती जंगली शिकारासोबत महेश गाय अशा प्राण्यांना खाण्यास त्यांनी सुरुवात केली त्यामुळे त्यांची टोडी गट पानवठा वेगळे करण्यात आले गोऱ्या या जमाती सोबत लग्न उत्सव विधीसाठी कोणताही संबंध ठेवण्यात येत नाही.

**देवदैवते**

कोरकू जमातीचे मुख्य देव मुठवा बाबा आहे. आपले पूर्वजमृत्यू नंतर आपले देव बनतात ही त्यांची धारणा त्यांची आठवण म्हणून मुडा बसवतात.

**मुडा बसवण्याची प्रक्रिया -** मुडा बसवण्यासाठी विशेष लाकूड आणायला जातात. रुठू, धावडा, सिपना झाडाची नावे .जातानी वंशपरंपरेनुसार घराचा वंश [लहान मुलगा] त्याला नवरा बनवतात आणि तो लहान मुलगा त्या लाकूडला डोक्यावर घेऊन येतो.तेव्हा लोकगीत म्हणतात .लोकगीत शिव्यांच्या स्वरूपात आहे. आणलेल्या लाकडावर पूर्वजांची प्रतिकृती बनवली जाते, व त्याची स्थापना शेतात झाडाखाली करतात हा जो विधी केला जातो.लग्न समारंभा सारखं केला जातो. या विधीत बोकुड कापतात आणि संपूर्ण गावाला जेवण दिलं जाते व सगळ्यांना दारू वाटल्या जाते. प्रत्येक विधी प्रसंगाला ते त्यांच्या पूर्वजांची पूजा करतात. लग्न समारंभाला त्यांना निमंत्रण देतात. पूर्वजांसाठी दारू दिल्या जाते. इथे कोणताही भगत पूजा करण्यासाठी नसतो. घराचा मुखिया त्यांना आठवण करून घराची कुटुंबाची व शेताची रक्षा करण्यासाठी प्रार्थना करतो. याबरोबरच निसर्गाला सुद्धा चंद्र, सूर्य ,डोंगर, नदी, पशुपक्षी यांचे आभार मानून निसर्ग पूजा करतो .

**मुठवा देवाचे गाणे**

मुठवा नागर सुवानो लाल

हात जोडो रे वोके पाय पडो रे राम

मुठवा नागर सुवानो लाल

सब देवतानसे महादेव बडो रे राम

मुठवा नागर सुवानो लाल

हात जोडो रे वोके पाय पडो रे राम

सब देवतान्से मुठवा बडो रे राम

**भवई पूजा**

भद्री पूजा हे खूप जूना शब्द आहे. याला समानार्थी शब्द आहे .भवई ही पूजा चैत्र महिन्यात केली जाते. भवई पूजा कोरकू जमातीचे पहिले सण आणि कोरकू पंचांग नुसार नवीन वर्षांची सुरुवात सुध्दा आहे. प्रामुख्याने ही जमात महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश येथे वास्तव्यास आहे. म्हणून भवई पूजा साजरा करण्याची पद्धती यामध्ये त्यांच्यात समानता दिसून येते.भवई पूजेचा प्रत्यक्ष संबंध शेतकरी कामाशी निगडित आहे. हा सण दोन प्रकारे

साजरा केला जातो. यामध्ये रांडो भवई आणि चिखल भवई असे दोन प्रकार पडतात. कोरकू गण व्यवस्थेनुसार ही पूजा भुमका (गाव पूजारी) पार पाडतो. वरुण देवाला साकडे घालणे व शेतीसाठी बि-बियाणे गोळा करणे हे या पूजेचे मुख्य उिद्दष्ट असते. त्यामुळे कोरकू जमातीमध्ये या सणाला खूप महत्त्व आहे. भवई पूजेचा दिवशी संध्याकाळी प्रत्येक घरातील एक सदस्य खेडा देव यांच्या देवठाण जवळ एकत्र येतात. घरातील एक व्यक्ती यामध्ये असणे गरजेचे असते गाव पंचायतीचे नियम मोडणाऱ्या व्यक्तीस दंड आकारला जातो.

मध्य प्रदेशातील कोरकू जमातीचे लोक भवई पूजेचा पहिल्या दिवशी १२ प्रकारच्या वृक्षांची लाकूड तोडून आणतात. यामध्ये मोह, आंबा, वड, भिवला, तेंदू अश्या विविध जंगली वृक्षांचा समावेश होतो. भुमका आणि परियार गांव बांधणी करतात.भवई पूजेमध्ये पाच प्रकारच्या बी-बियाणे आणि पांढरा कांदा याचे विशेष महत्त्व आहे. प्रत्येक घरातील व्यक्ती पूजेसाठी हे बी-बियाणे घेऊन येतात खेडा देवासमोर त्या बी-बियाण्यांची पूजा केली जाते. भुमका यावर्षी सुध्दा चांगले पीकपाणी होऊ दे म्हणून देवाला प्रार्थना करतात. नैवेद्य दाखवतात. भुमका है बी-बियाणे सर्वांना मोह फूलाच्या पानात गुंडाळून देतात लोक हे- बियाणे पेरणीसाठी आणलेल्या बियाण्यासोबत एकत्र करून पेरणी करतात.महाराष्ट्रातील कोरकू जमातीचे लोक सुद्धा याच पद्धतीने भवई पूजा करतात. यादिवशी लोक खेडा देवाजवळ एकत्र येतात आणि रात्री बांबूच्या काठ्या एकमेकांना रगडतात. त्यातून जळालेल्या आगीतून प्रत्येक घरातील चुल पेटवली जाते. चुलीतील विस्तव पुढील भवई पूजा येईपर्यंत विझू देत नाही. आज ही परंपरा काही ठिकाणीच दिसून येते.भवई पूजेचा दिवशी भुमका खेडा देवा जवळ गाडलेल्या संजई देवीचे प्रतीक असलेल्या अंड्याचा आकाराएवढा दगड तेथून काढून त्याची पूजा करतात. लोक मान्यता आहे की, संजई देवी हे समृध्दीचे प्रतीक आहे. लोकांनी आणलेल्ले बियाणे भुमका खेडा देवा समोर ठेवून पूजा करतात. जंगलातून आणलेल्या बांबूच्या काठ्या तेथे ठेवल्या जातात. यावेळी खेडा देवा समोरील जमीन उकरून त्यात बी पेरले जातात. पाणी शिंपडले जाते. त्यावेळी तेथे असलेले लोक वीज कडाडण्याचे आवाज काढतात, यामागील हेतू आहे की, पावसाळा लागणार आहे. चांगला पाऊस पडला की शेती पेरणीच्या कामाला सुरुवात करु शकतात..

भवई पूजा करून भुमका खेडा देवा जवळील बियाणे लोकांना वाटतात. यावेळी त्यांच्या डोळयांवर पांढरा कापड बांधला जातो आणि सर्वांना सारख्या प्रमाणात बियाणे वाटले जाते. लोक भुमकाच्या पाठीमागे उभे राहून ओंजाळीभर वाटल्या जाणाऱ्या बीया घेतात. त्यांचा बियांचा या आदिम आदानप्रदान पध्दती उल्लेखनीय आहे.बांबूच्या काठ्या या पूजेचे एक वैशिष्ट्यपूर्ण आकर्षणाचा केंद्रबिंदू आहे. यामध्ये लोक गोलाकार उभे राहून

जाळलेल्या अग्नीला विझविण्यासाठी बांबूच्या काठ्या त्यावर आपटतात.आणि आग विझवतात. बांबूच्या काठ्यांचा एकमेकांवर आदळणे आणि एकत्र येणे हे शुभ मानले जाते. असे कोरकू जमातीतील लोकांची धारणा आहे.

डेडरा माता पूजेसाठी गावातील लहान मुले-मली आणि स्त्रिया धान्य गोळा करतात. या पूजेसाठी नदीच्या काठावरून टोपली मध्ये पाच बेडूक आणले जाते. याचा मान कास्दा आणि मवासी गोत्रातील मुलामुलींना दिला जातो.मुले जांभळाच्या फांद्या कमरेला बांधतात. मुली डोक्यावर टोपली घेतात. स्त्रीया गीत गातात आणि धान्य गोळा करतात. मुलामुलींमधून एक वरवधूचे जोडपे बनवले जाते. वधूच्या डोक्यावर पाण्याने भरलेला गळवा ठेवला जातो. सर्व लोक ढोल बासरी वाजवत खेड़ा देवा जवळ जातात आणि वधूच्या डोक्यावर घेऊन आलेला गळव्याचे तोंड जमीनीवर ठेवतात. पाऊस कोणत्या दिशेने येणारआहे याचा अंदाज घेतात. पावसासंबंधित त्यांचा हे अंदाज खरा ठरतो . हेच त्यांचे निसर्गाशी एकरूप असल्याचे प्रतीक मानले जाते.

**देदरा माता गाना**

१)इंडी उरा जे गा डो ,पेटेल आबा गा डो

कुठी के पाळाय, गहू का सेगे

२) डा सेगे डो रोमोती ,बाबा पाला लोखोलेन डो रोमोती

अखोळे तेम्ब्या टे ,डा सेगे डो रोमोटी

३) पेटेल बाबा उरा कोरा लेंडी ,ओलेडे ओलेडे सेरोम सेरोम

मिचां बी बान ,बुलूम बी बान ,कोब्दालेन डा का बान

**विवाह संदर्भात चालीरीती:-** कोरकू जमातीमध्ये लग्नाच्या काही दिवसा अगोदर पासूनच लग्नाची तयारी सुरू होते. कोरकू आदिवासी जमातीमध्ये हुंडा प्रकार आहे. त्याला गोणम असे म्हणतात. गोणम मुलगा देतो .गोणम देण्याची पद्धत आधी धान्यापासून होती आता ते पैशाच्या स्वरूपात झाली आहे. लग्नाच्या आदल्या दिवशी सगळं गावकऱ्यांना निमंत्रण दिले जाते निमंत्रण कुंकू लावून दिले जाते गावातील काही मुलं पुरुष मंडळी मांडव बांधण्याची तयारी करतात ,त्यासाठी लागणारे जांभुळाच्या झाडाच्या पानाच्या फांद्या बैल गाडीने आणतात .ज्यांनी हे फांद्या आणल्या त्यांच्या पाठीवर नवरी किंवा नवरा हळदिच्या हाताचे पाठीवर पंजा मारतो .लग्नमांडव नऊ खांबाचे असतात. मधला खांब हा महत्त्वाचा असतो. त्याला तांबा म्हणतात .त्या तांबेवर

चित्र कोरल्या जाते, नानी चिटकवले जाते ,आणिकुमारी पाच मुली त्या खांबाला हळद लावतात. स्त्रिया लोकगीत म्हणतात.

मांडवाच्या खाली दोन लहान माठ नानी टाकून ठेवल्या जाते तेव्हाही लोकगीत म्हटले जाते .त्यानंतर स्त्रिया लहान मुलं नवरदेव किंवा नवरीला घेऊन त्यांच्या सगळ्या देवतांची पूजा करायला निघतात. पूजा करताना स्त्री पुरुष ढोल पावी बासुरी नृत्य करून संपूर्ण गाव फिरतात रात्रीला नवरदेव किंवा नवरीला अंघोळ घालतात. आणि पाच मुली रात्रभर तासा तासांनी पाच वेळा हळद लावतात. वृद्ध स्त्रिया रात्रभर लोकगीत म्हणतात. पुरुष स्त्रिया रात्रभर ढोल,पावीच्या तालात गदली सुसून करतात दुसऱ्या दिवशी लग्न लावल्या जाते आणि बैलगाडीने किंवा पायीच नवरदेव नवरीला घ्यायला निघालेला असतो.

**लग्न गीत**

पिपरी पाला रेपे रेपे बोले,आओ समदी क्यू नही बोले
समदी के लिए चावल पकाओ, पिपरी पाला रेपे रेपे बोले
आओ समदी क्यू नही बोले,समदी के लिए मटन पकाऊ
आओ समधी क्यू नही बोले,समदी के लिए दारू बुलाओ
आओ समदी क्यू नही बोले,पिपरी पाला रेपे रेपे बोले

**सन उत्सव:-** आदिवासी कोरकू यांच्या लोक जीवनात होळीला महत्त्वाचे स्थान आहे. होळी हा कोरकुंचा सगळ्यात मोठा सण आहे. कोरकू आदिवासी जमातीमध्ये दोन होळी जाडल्या जाते. या दोन होळी मधून दुसरी मोठी होळी व पहिली लहान होळी असते. होळी जाळण्यासाठी गावाचे प्रत्येक घरातून लाकूड जमा केली जाते. बांबूचे झाड आणि त्याला केसा फुल [पळसाचे फूल] लावून सजवून होळी उभी केली जाते. होळीचे पूजा पहिले गावाचा मुखिया करतो आणि त्यानंतर गावाचे लोक करतात. पूजा झाल्यावर मुखिया होळीला आग लावते. आग लागल्याबरोबर पुरुष व स्त्री मंडळी लोक गीताला सुरुवात करतात. लोकगीत झाल्यानंतर ढोल, पावी[ बासुरी ]पुरुष मंडळी वाजवतात व स्त्रिया मुली थापटी घोय व एका हातात पानाची फांदी घेऊन नृत्य करतात. होळी जळाल्यानंतर स्त्रिया रावणाच्या ज्येष्ठ पुत्र मेघनाथ बाबा याची पूजा करतात. होळी जडत असताना त्यातील जळत असलेल्या काळीने शेवटच्या बोटाला चटके घेतात. त्यांची श्रद्धा आहे चटका घेतल्यानंतर डोळे न येणे ,आजार रोगराई यापासून दूर राहते होळी जळून झालेल्या दुसऱ्या दिवशी उरलेली ती राख आहे त्या राखीने गावाला रेघ ओढतात तीए रेघ सुद्धा गावात रोगराई पासून संरक्षण करते. काही लोक त्या राखेने अंघोळ

करतात .त्यापासून शरीरात असलेला आजार दूर होते. या जमातीत लोकांची होळी पाच दिवसाची असते. पाच दिवस उत्सव नृत्य लोकगीते म्हणतात पाच दिवस स्त्री पुरुष फगवा मागतात.

**होळी लोकगीत**

डो टोनेन देवाके लिजको को राजा रे राम रे

धरती आसमान लीजको को राजा रे राम रे

डो खेळा मुठवा के लिये को राजा रे राम रे

डो राम लक्ष्मण के लिजको राजा रे राम रे

डो भीम अर्जुन के लिजको रे राजा रे राम रे

पाची पांडव के लिजको राज रे राम रे

**फगवाई गीत**

आजो का दिन नही छोडे भैय्या, प्यारा फगवा दे रे

सिरका टोपी बेचो भैय्या देव रे ,हमारा फगवा दे रे

भला से देवो भैय्या बुरा से देव रे ,देवो हमारा फगवा दे रे

घरा का गाडी गिरवा रखो भैय्या देव रे,हमार फगवा दे रे

भला से दे वो भैय्या बुरा से देव रे, देव हमारा फगवा दे रे

बहन का साडी गिरवा रखो भैय्या देव रे ,हमारा फगवा दे रे

भला से दे रे बुरा से दे रे ,देव हमारा फगवा दे रे

बेचो तुम्हारो हातो का घडीयल देव रे ,हमारा फगवा दे रे

भला से दे रे बुरा से दे रे देव रे, हमारा फगवा देव रे

**जन्ममृत्यू संदर्भातील प्रथा परंपरा**:-

**जन्म:-** जमातीत प्रसुती करण्यासाठी सुईनी ती घरातच बाळंतपण करून द्यायची, बाळाच्या नाळीला धारदार विळयाने कापल्या जाई .पाचव्या दिवशी पाचवी असते. पाचवीच्या दिवशी बाळाला घराच्या आत मध्ये अंघोळ घातली जाते अंघोळ आटोपल्यानंतर खड्डा बुजून टाकायचे बुजवलेल्या मातीत माडाची शेंडी[ बांबूचे झाडाचे फांद्या ] टेंभूचे पाच फांद्या खूपसून तिथे पूजा करतात पूजेत खेकडे, मासे, नदीतून आणलेले दगड ठेवले

जातात.जेव्हा तो मोठा होईल तेव्हा तो नदीत खेकडे, मासे पकडायला गेल्यावर त्याला खेकडे लाभले पाहिजे अशाप्रकारे सुईणी आजी मानवंदना देऊन देवाची पूजा करतात .

**मृत्यू:-** मरण पावलेल्या अंत्यविधीसाठी सगळ्यात आधी आंघोळ घालून नवीन कपडे घातले जाते लग्न झालं असेल तर लग्नाचे कपडे घातले जाते त्या व्यक्तीच्या पायाजवळ सुपारी, दिवा, अगरबत्ती पेटवतात. दूर्वा ,तांदूळ व पैसे डोक्यावरून पायापर्यंत फिरवून सुपडीत ठेवतात .सगळयांची भेटीगाठी मृत व्यक्तीला जेवण व एक रुपया ठेवून शेवटची भेट घेतात पुरवायला जाताना त्या व्यक्तीचे सामान आणि त्याच्यासाठी ताट, ग्लास ,भांडे नेतात अंत्यविधीसाठी फक्त पुरुष मंडळी जातात अंत्यविधी करून आल्यावर घराच्या दाराजवळ उभे राहून हळदीचे पाणी अंगावरून घेतेले जाते ,किंवा कोळसा आणून पायाखाली ठेवल्या जाते व मागच्या दाराने आंघोळ करूनघरात प्रवेश करतात, स्रिया सपूर्ण घर सारून नवीन स्वच्छ पाणी भरून स्वयंपाक करतात दहाव्या दिवशी दसवा केला जातो . त्यादिवशी मृत व्यक्ती कोणाच्यातरी अंगात येऊन भेटीगाठी करतो.आणि असा गावकऱ्यांचा समज असतो . दशक्रिया च्या दिवशी गावातील लोकांना जेवण दिल्या जाते .

**समारोप:-** कोरकू जमात त्यांची संस्कृती भिन्न आहे ही जमात मेळघाटात असून निसर्गाच्या सानिध्यात जीवन जगत करीत आहे. त्याचं जीवन निसर्गा पासून सुरू होऊन निसर्गातच संपत आहे त्याच्याकडे अफाट संस्कृती वनौषधीचे ज्ञान , लोककला ,लोकगीत याचा भंडार त्याच्याजवळ आहे .कोरकू जमातीमध्ये ढोल आणि पावी [बासुरी] याचं महत्त्वपूर्ण स्थान आहे. जणू संपूर्ण कोरकू जमात वर्षानुवर्षापासून या ढोलाच्या तालावर नृत्य करत आहे. याचे सण उत्सव, भवई ,नागपंचमी,, दशरा ,दिवाळी इत्यादी आहेत .त्यांच्या वेगवेगळया प्रथा विधी आहेत. कधी पाऊस येण्यासाठी तर कधी धान्य मिळालं म्हणून तो निसर्गाचा आभार मानतो मातृसत्ताक पद्धती असलेल्या या जमातीने वर्षानुवर्ष परंपरेनुसार त्यांची संस्कृती जपून ठेवली आहे,

**निष्कर्ष :**

१.कोरकू आदिवासी लोकांचे लोकजीवन निसर्गाशी निगडीत आहे .त्यांची लोकसंस्कृती निसर्गाच्या सानिध्यात वाढलेली आहे.

२. कोरकू आदिवासी लोकांचे दैवत त्यांचे पूर्वज आणि निसर्ग आहे.

३.कोरकू लोकांचे लोकगीत, लोककथेत नद्यांचा,डोंगरांचा ,पशु-पक्ष्यांचा समावेश आढळून येते.

4.कोरकू जमातिच्या संस्कृती आणि इतर आदिवासी जमातीच्या संस्कृतीत साम्य आढळते.

५.''कोरकू'' या शब्दामध्येच ''समूहाणे राहणारे लोकं'', म्हणजेच ही जमात टोळीने समूहाने राहणारे आहेत.

६ .कोरकू समूहामध्ये होळी या सणाला महत्व आहे आणि ढोल व पावी च्या तालात नृत्य करणारी ही जमात निसर्गाच्या सानिध्यात राहत आहे.

७ .कोरकू जमातीत शेतीशी संबधित विधी, विवाह विधी, जन्म-मृत्यू विधी निसर्गाशी जूळून आहे.

**संदर्भ ग्रंथ:- १)** लांबजाना एक वेगळी प्रेम कथा- वऱ्हाड प्रकाशन सोनी डॉ. रावसाहेब मुरलीधर काळे.

२)भवई :कोरकू समुदाय के कृषी कर्म पूर्व कि पूजा विधी -रोशन रामदास जांबू

३)आदिवासी लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती -डॉ .मोतीराम रावजी देशमुख[ फडकी मासिक ]